पावसाळ्यापूर्वी नालेसफाईला गती

३१ मेपर्यंत कामे पूर्ण करण्याचे आदेश

मुंबई, दि. ०६ (प्रतिनिधी): पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात पाणी साचण्याच्या समस्या टाळण्यासाठी महानगरपालिकेकडून नालेसफाईच्या कामांना वेग देण्यात आला असून, सर्व कामे ३१ मेपर्यंत पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. अतिरिक्त महापालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा यांनी पश्चिम उपनगरांतील विविध नाल्यांची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना कामांचा वेग वाढवण्याचे आदेश दिले.

मंगळवारी करण्यात आलेल्या पाहणी दौऱ्यात कांदिवली, बोरिवली आणि दहिसर परिसरातील मोठ्या तसेच लहान नाल्यांमधील गाळ काढण्याच्या कामांचा आढावा घेण्यात आला. दहिसर येथील पायल हॉटेल जंक्शन, रिव्हर व्ह्यू पुलाजवळील दहिसर नदी, मलजल प्रक्रिया केंद्र, म्हात्रे नाला, पोईसर नदी आणि लालजी पाडा या ठिकाणी सुरू असलेल्या कामांची सखोल तपासणी करण्यात आली. यावेळी डॉ. शर्मा यांनी नाल्यांमधून काढलेला गाळ पुन्हा रस्त्यावर किंवा नदीत जाणार नाही, याची विशेष खबरदारी घेण्याचे निर्देश दिले. महानगरपालिकेने यंदा नालेसफाईसाठी पूर्वतयारीवर भर दिला असून, पावसाळ्यापूर्वीच सर्व कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. गेल्या काही वर्षांत पावसाळ्यात पाणी साचण्याच्या घटनांमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला होता.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने यंदा अधिक काटेकोर नियोजन केले असून, वेळेत गाळ काढून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यावर भर देण्यात येत आहे.

या पाहणीवेळी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. प्रशासनाने आतापासूनच कंबर कसून कामाला लागल्याने यंदाच्या पावसाळ्यात पूरस्थिती आणि पाणी साचण्याच्या समस्यांमध्ये काही प्रमाणात दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे

पुण्यात पादचारी सुरक्षेचा प्रश्न गंभीर; वर्षभरात १२० मृत्यू, ४३% तक्रारींकडे दुर्लक्ष

पुणे, दि. ०६ (वार्ताहर) : पुणे शहरात पादचारी सुरक्षेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असल्याचे समोर आले आहे. गेल्या वर्षभरात रस्ते अपघातांमध्ये तब्बल १२० पादचाऱ्यांचा मृत्यू झाला असून, 'माय वॉक माय राइट' मोहिमेअंतर्गत करण्यात आलेल्या तक्रारींपैकी ४३ टक्के तक्रारींकडे महापालिकेने दुर्लक्ष केल्याचे अहवालात स्पष्ट झाले आहे.'परिसर' संस्थेने पादचारी मार्ग, अतिक्रमण आणि सुरक्षिततेसंदर्भातील एकूण ३०२ तक्रारींचा आढावा घेतला. त्यापैकी केवळ ११४ तक्रारींचे पूर्ण निवारण झाले, तर ५९ तक्रारी प्रक्रिया सुरू अवस्थेत आहेत. मात्र १२९ तक्रारी या पूर्णपणे प्रक्रियेबाहेर राहिल्या असून त्या प्रलंबित, नाकारलेल्या किंवा अडकून पडलेल्या आहेत.

'नवघाणी' शब्द बदलण्याचा निर्णय; बेस्टमध्ये ६८६ कामगारांची तातडीने भरती

मुंबई, दि. ०६ (प्रतिनिधी) बेस्ट प्रशासनातील 'नवघाणी' या शब्दामुळे कामगारांना बँकांकडून कर्ज मिळण्यात अडचणी येत असल्याने हा शब्द बदलण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. त्याचबरोबर मान्सूनपूर्व कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी ६८६ नवघाणी कामगारांची तातडीने भरती करण्यास बेस्ट समितीने मंजुरी दिली आहे.

बेस्टच्या विद्युत पुरवठा विभागात खोदकाम करणे, केबल लाईनसाठी खड्डे तयार करणे तसेच विद्युत उपकरणांची ने-आण करणे अशी कामे करणाऱ्या कामगारांना 'नवघाणी' म्हणून ओळखले जाते. मात्र या शब्दाचा नेमका अर्थ बँकांच्या नोंदींमध्ये स्पष्ट न झाल्यामुळे अशा कामगारांना कर्ज मिळण्यात अडथळे येत आहेत. या पार्श्वभूमीवर बेस्ट समितीच्या बैठकीत हा शब्द बदलून अधिक स्पष्ट आणि व्यवहार्य पर्याय स्वीकारण्याबाबत चर्चा करण्यात आली. दरवर्षी सुमारे १५० कामगार निवृत्त होत असल्याने बेस्टमधील मनुष्यबळ कमी होत आहे. सध्या सुमारे १२६० पदे रिक्त असून, शहरातील जवळपास १० लाख वीज ग्राहकांना सेवा देताना अडचणी निर्माण होत आहेत. परिणामी, वारंवार वीज खंडित होण्याच्या घटनाही समोर येत आहेत.

या परिस्थितीचा विचार करून मान्सूनपूर्व दुरुस्ती आणि देखभाल कामे सुरळीत पार पाडण्यासाठी ६८६ कामगारांची तातडीने भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कामगारांना अधिक सुस्पष्ट ओळख मिळाल्याने आर्थिक व्यवहारातही सुलभता येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

बिबट्या शिरकाव प्रकरणानंतर धाडसी बचावकार्याचा गौरव; अग्निशमन व वन विभागाच्या अधिकाऱ्यांचा महापौरांकडून सन्मान

मिरा-भाईंदर, दि. ०६ (वार्ताहर) : भाईंदर पूर्वेतील तलाव रोड परिसरात घडलेल्या बिबट्या शिरकावाच्या थरारक घटनेनंतर जीवाची पर्वा न करता बचावकार्य करणाऱ्या अग्निशमन दल आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांचा आज महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत गौरव करण्यात आला. महापौर डिंपल मेहता यांच्या हस्ते या अधिकाऱ्यांना प्रशस्तीपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगामुळे शहरातील आपत्कालीन यंत्रणांची तत्परता आणि धाडस पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

डिसेंबर महिन्यात रात्रीच्या सुमारास तलाव रोड परिसरात बिबट्या शिरल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. एका तरुणीवर बिबट्याने हल्ला केल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली होती. स्थानिक नागरिकांनी तात्काळ प्रशासनाला कळविल्यानंतर अग्निशमन दल आणि वन विभागाच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेतली. परिस्थितीची तीव्रता लक्षात घेता बचावकार्य अत्यंत आव्हानात्मक ठरत होते.

अग्निशमन दलाने धाडस आणि शिताफी दाखवत एका घरात अडकलेल्या कुटुंबाला सुरक्षित बाहेर काढले. प्रत्येक क्षण तणावपूर्ण असतानाही जवानांनी समन्वय आणि तत्परतेने काम करत जीवितहानी टाळण्यात यश मिळवले. त्यानंतर वन विभागाने विशेष जाळे आणि यंत्रणांचा वापर करून संयुक्त मोहीम राबवली आणि अखेर बिबट्याला यशस्वीरित्या पकडण्यात आले. या कारवाईमुळे नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला. महापौर डिंपल मेहता यांनी या धाडसी कार्याचे कौतुक करत अशा परिस्थितीत काम करणारे अधिकारी हे शहराचे खरे रक्षक असल्याचे नमूद केले. सभेत उपस्थित नगरसेवक आणि अधिकाऱ्यांनीही या कामगिरीचे स्वागत करत अशा कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. या घटनेमुळे विविध विभागांमधील समन्वयाचे महत्त्व अधोरेखित झाले असून, नागरिकांमध्ये सुरक्षेबाबतचा विश्वास अधिक दृढ झाल्याचे दिसून आले.

ठाण्यात २५ टक्के पाणीकपात; टँकरवर वाढते अवलंबित्व, नागरिकांचे हाल

ठाणे, दि. ०६ (वार्ताहर) : ठाणे शहरात पाणीटंचाईचे संकट अधिक तीव्र झाले असून मुंबई महापालिका आणि औद्योगिक विकास महामंडळाकडून मिळणाऱ्या पुरवठ्यात कपात झाल्याने एकूण २५ टक्के पाणीकपात लागू करण्यात आली आहे. या परिस्थितीमुळे शहरातील अनेक सोसायट्यांना टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत असून, नागरिकांना मोठा आर्थिक भार सहन करावा लागत आहे.

सध्या उन्हाच्या तीव्रतेमुळे विहिरी आणि बोअरवेलसारख्या स्थानिक जलस्रोतांवरही परिणाम झाला आहे. परिणामी, साकेत येथील पाणी भरणा केंद्रातून दररोज ७५ ते ८० टँकरची मागणी होत आहे. महापालिकेकडून काही प्रमाणात मोफत टँकर उपलब्ध करून दिले जात असले, तरी त्यानंतर प्रत्येक टँकरसाठी नागरिकांना हजारो रुपये खर्च करावे लागत आहेत. खासगी टँकरकडून मनमानी दर आकारले जात असल्याच्या तक्रारीही वाढत आहेत.

ठाण्यातील वेगाने होत असलेले शहरीकरण हे या संकटामागील महत्त्वाचे कारण मानले जात आहे. विशेषतः घोडबंदर परिसरात मोठ्या प्रमाणात गृहसंकुले उभी राहिल्याने पाण्याची मागणी झपाट्याने वाढली आहे. मात्र, आवश्यक त्या प्रमाणात पायाभूत सुविधा विकसित न झाल्याने पाणीपुरवठ्यावर ताण निर्माण झाला आहे. सध्या शहराला दररोज ६२७ दशलक्ष लिटर पाण्याची आवश्यकता असताना प्रत्यक्षात केवळ ५९० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होत असल्याची कबुली प्रशासनाने दिली आहे.

दरम्यान, देखभाल व दुरुस्तीच्या कामांमुळे गुरुवार दुपारी १२ वाजल्यापासून ते शुक्रवारी दुपारी १२ वाजेपर्यंत काही भागांमध्ये पाणीपुरवठा पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. या कालावधीत कळवा, वागळे आणि मानपाडा परिसरासह अनेक भागांतील नागरिकांना पाण्याविना राहावे लागणार आहे. या वाढत्या टंचाईमुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत असून, प्रशासनाने दीर्घकालीन उपाययोजना राबवण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

बंगळुरूमध्ये 'रामय्या इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड मॅनेजमेंट'ची स्थापना; जागतिक दर्जाच्या शिक्षणाला चालना

मुंबई, दि. ०६ (प्रतिनिधी) : शिक्षण क्षेत्र आणि प्रत्यक्ष उद्योगजगत यांच्यातील दरी कमी करण्यासाठी गोकुळा एज्युकेशन फाउंडेशनने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत बंगळुरूमध्ये 'रामय्या इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड मॅनेजमेंट' या नव्या विद्यापीठाची स्थापना जाहीर केली आहे. अग्रगण्य आंतरराष्ट्रीय संस्थेशी भागीदारीत सुरू होणारे हे विद्यापीठ विज्ञान, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन शिक्षणाला जागतिक स्तरावर नेण्याचा प्रयत्न करणार आहे.

गोकुळा एज्युकेशन फाउंडेशनकडून चालविल्या जाणाऱ्या विविध शैक्षणिक आणि वैद्यकीय संस्थांच्या अनुभवाच्या बळावर ही पुढाकार घेण्यात आली आहे. या नव्या विद्यापीठासाठी अमेरिकेतील प्रतिष्ठित सार्वजनिक संशोधन विद्यापीठाशी शैक्षणिक सहकार्य करण्यात आले असून, अभ्यासक्रम आणि संशोधनाच्या दर्जात आंतरराष्ट्रीय निकषांचे पालन केले जाणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील ज्ञान आणि कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळणार आहे.

नव्या संस्थेमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित तसेच व्यवस्थापन या क्षेत्रांवर विशेष भर दिला जाणार असून, उद्योगाभिमुख अभ्यासक्रम राबविण्यात येणार आहेत. संशोधन, नवकल्पना आणि प्रत्यक्ष प्रयोगांवर आधारित शिक्षण प्रणालीमुळे विद्यार्थ्यांना बदलत्या जागतिक परिस्थितीत सक्षम बनविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

हे विद्यापीठ ऑगस्ट २०२६ पासून पहिले शैक्षणिक सत्र सुरू करणार असून, देश-विदेशातील विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्याची तयारी सुरू आहे. या उपक्रमामुळे उच्च शिक्षण क्षेत्रात नवे मानदंड निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच उद्योगजगताशी थेट संलग्न अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेतही लक्षणीय वाढ होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे. यासोबतच संशोधन व नवोपक्रमांना चालना मिळून देशाच्या ज्ञानआधारित अर्थव्यवस्थेला बळकटी मिळण्याची शक्यता आहे.

सार्वजनिक सूचना

याद्वारे जनतेला कळविण्यात येते की, आम्ही आमच्या पक्षकाराच्या वतीने, श्रेयस को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लिमिटेड (एक सहकारी गृहनिर्माण संस्था, जी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि त्याखालील नियमांतर्गत दिनांक ०९ मार्च, १९९४ रोजी नोंदणी क्र. बीओएम/डब्ल्यूआर/एचएसजी/टीसी/८६९५/९३-९४ अन्वये नोंदणीकृत आहे आणि जिचे नोंदणीकृत कार्यालय पद्मनागर, इमारत क्र. ७, शिंपोली लिंक रोड, चिकूवाडी, बोरीवली (पश्चिम), मुंबई- ४०० ०९२ येथे आहे, (यापुढे 'सोसायटी' असा उल्लेख) यांच्या मालकी हक्काची, शीर्षकाची आणि हिताची पडताळणी खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या सोसायटीच्या मालमत्तेच्या बाबतीत ('मालमत्ता') मालमत्तेचे विकास हक्क प्राप्त करण्याच्या उद्देशाने करीत आहोत.

ज्या कोणा व्यक्तीचा/संस्थेचा सदर मालमत्तेमध्ये किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये किंवा विकास क्षमतेमध्ये किंवा त्यावर बांधल्या जाणाऱ्या सदनिका/परिसर/घटकांमध्ये विक्री, हस्तांतरण, अभिहस्तांतरण, अदलाबदल, वाटप, बोजा, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, परवाना, गहाण (समभागीय किंवा अन्य), वारसाहक्क, कब्जा, ताबा, हिस्सा, भेट, धारणाधिकार, बाह्य खर्च, देखभाल, सुलभता, ट्रस्ट, मुनिमेंट, करार किंवा अट, मुक्तता, त्याग किंवा इतर कोणत्याही कराराद्वारे, दस्तऐवजाद्वारे, लेखनाद्वारे, हस्तांतरण पत्राद्वारे, मृत्युपत्राद्वारे, वारसाहक्काद्वारे, कौटुंबिक व्यवस्था/निकालाद्वारे, न्यायालयाच्या किंवा लवादाच्या किंवा महसूल किंवा वैधानिक प्राधिकरणाच्या डिक्री किंवा आदेशाद्वारे, निवाड्याद्वारे, कराराद्वारे, किंवा विकास हक्काद्वारे किंवा एफएसआय/टीडीआर वापरामुळे, किंवा अन्य कोणत्याही प्रकारे असो, अशा सर्वांनी सदर दाव्याची, कोणत्याही प्रकारचा कोणताही हिस्सा, हक्क, शीर्षक, इस्टेट, स्वारस्य, दावा, लाभ, आक्षेप आणि/किंवा मागणी असल्यास, त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत वैध कागदोपत्री पुराव्यासह खाली स्वाक्षरी करणाऱ्यांना त्यांच्या कार्यालय क्र. ३०३, ३ रा मजला, हाईव्ह ६७, व्होरा आयकॉन, रघुलीला मेगा मॉलच्या मागे, कांदिवली (पश्चिम), मुंबई- ४०००६७ (jainashah9@outlook.com) येथे लेखी स्वरूपात कळवावे. विहित मुदतीत असा कोणताही दावा, हिस्सा, हक्क, शीर्षक, लाभ, हितसंबंध, आक्षेप आणि/किंवा मागणी प्राप्त न झाल्यास, असा कोणताही दावा अस्तित्वात नाही आणि/किंवा तो सोडून दिला आहे किंवा त्यागला आहे असे गृहीत धरले जाईल आणि आमचे पक्षकार सोसायटीकडून मालमत्तेचे विकास हक्क प्राप्त करण्याची प्रक्रिया पूर्ण करतील.

वरील संदर्भित अनुसूची

गहाण मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड ज्याचे क्षेत्रफळ १९५८.९० (एक हजार नऊशे अठ्ठावन्न पूर्णांक नऊ शून्य) चौ. मीटर आहे, तसेच सामायिक आर.जी. मधील प्रमाणित अविभाजित हिस्सा/हक्क क्षेत्रफळ ३६५.१४ (तीनशे पासष्ट पूर्णांक एक चार) चौ. मीटर आणि सामायिक अंतर्गत रस्त्यामधील क्षेत्रफळ ९३.६१ (त्र्याण्णव पूर्णांक सहा एक) चौ. मीटर, असे एकूण क्षेत्रफळ २४१७.६५ (दोन हजार चारशे सतरा पूर्णांक सहा पाच) चौ. मीटर आहे. सदर जमीन मोठ्या जमिनीच्या भागाचा हिस्सा असून नवीन अंतिम भूखंड क्र. ५०२, क्षेत्रफळ १२,७००.७० (बारा हजार सातशे पूर्णांक सात शून्य) चौ. मीटर, उपविभाजित भूखंड क्र. ७, जुना अंतिम भूखंड क्र. ४८३, मसुदा नगर नियोजन योजना III, बोरीवली, सर्वे क्र. ३६/२, सीटीएस क्र. ३८९/६, पूर्वी गाव एक्सर, तालुका बोरीवली येथे स्थित असून, पद्म नगर, बोरीवली लिंकिंग रोड, शिंपोली गाव, बोरीवली (पश्चिम), मुंबई-४०० ०९२ येथे वसलेली आहे. त्यावर "श्रेयस को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लिमिटेड" या नावाची निवासी इमारत आहे, ज्यामध्ये विंग 'ए' आणि 'बी' प्रत्येकी तळमजला अधिक ४ (चार) वरचे मजले (लिफ्टशिवाय) आणि विंग 'सी' तळमजला अधिक ४ (चार) वरचे मजले अधिक पाचव्या मजल्याचा काही भाग (लिफ्टसह) आहे, एकूण ६४ (चौसष्ट) निवासी फ्लॅट्स आहेत. सदर जमिनीच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेतः उत्तरेस किंवा उत्तर दिशेकडे १८.३ मीटर रस्ता; दक्षिणेस किंवा दक्षिण दिशेकडे रिकामा भूखंड; पूर्वेस किंवा पूर्व दिशेकडे पवन सीएचएसएल; आणि पश्चिमेस किंवा पश्चिम दिशेकडे श्री राजलक्ष्मी सीएचएसएल.

सदर ७ मे २०२६ रोजी दिनांकित

अॅड. जैना शाह, संस्थापक,
जेएस लॉ असोसिएट्स

MAHAVITARAN — e-Tender Notice

Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

Following Tenders are invited in prescribed Tender forms for following Works/Items from reputed e-registered contractors with MSEDCL for following work.

Sr. No.	Tender No.	Name of Tender	Tender Amount (Rs.)	Tender Fee (Rs.)	Last date of Tender submission
1	EE/VRR/ RELAY/ T-04/ 2026-27	Tender for Supply of Numerical non directional IDMT 3 O/C + 1 E/F Protection Relay and Master Relay from MSEDCL Approved Vendors for Virar div.	5.00 Lakh	1000/- + @18% GST	19/05/2026, 10:00 Hrs

The tender documents are available at our website **http://works.mahadiscom.in/eTender/etender from 07-05-2026 & Last date for submission of tender duly filled by 19-05-2026 up to 11.00 Hrs.**
For updates visit to our official website of MSEDCL.
Contact person :- The Assistant Engineer (Purchase), MSEDCL, Virar Division, MSEDCL Staff Colony, Building No. 18, Flat No. 3 & 4, Navghar East, Tal: Vasai, Dist: Palghar Mob. No.: 9028354152 Email ID: eevirar2024@gmail.com

SD/-
EXECUTIVE ENGINEER, VIRAR DIVISION

होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड

homefirst — We'll take you home

३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या वर्षाच्या आणि तिमाहीच्या आर्थिक निकालांचे विवरण

लेखापरीक्षण समितीच्या शिफारशीनुसार, कंपनीच्या संचालक मंडळाने बुधवार, दिनांक ६ मे २०२६ रोजी झालेल्या बैठकीत ३१ मार्च २०२६ रोजी समाप्त झालेल्या तिमाही व वर्षासाठीचे कंपनीचे लेखापरीक्षित आर्थिक निकाल ("**आर्थिक निकाल**") मंजूर केले आहेत.

Q4FY26 थोडक्यात

	एयूएम	वितरण	जीएनपीए	पीएटी
	₹१५,८७८ कोटी	₹१,५७२ कोटी	१.८%	₹१४९ कोटी
YoY	+२४.९%	+२३.५%	+१० bps	+४२.७%
QoQ	+६.४%	+१९.३%	-२० bps	+६.६%

आर्थिक निकाल पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा

आर्थिक निकाल, लेखापरीक्षण अहवालासह (आर्थिक निकालांवरील अपरिवर्तित मतासह), मे. बी. एस. आर. अँड कंपनी एलएलपी, चार्टर्ड अकाउंटंट्स (फर्म नोंदणी क्रमांक: १०१२४८W/W-१०००२२) यांनी सादर केला असून, तो कंपनीच्या संकेतस्थळावर (https://homefirstindia.com/investor-relations#financial-results), बीएसई लिमिटेड (www.bseindia.com) आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (www.nseindia.com) येथे उपलब्ध करून देण्यात आला आहे.

टीप: वरील सूचना ही सेबी (लिस्टिंग दायित्वे व प्रकटीकरण आवश्यकता) नियमन, २०१५ मधील नियम ३३ सह नियम ४७(१) अन्वये देण्यात येत आहे.

ठिकाण: मुंबई
दिनांक: ६ मे २०२६

स्वाक्षरी/-
मनोज विश्वनाथन
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी

नोंदणीकृत कार्यालय:५११, ऍकमे प्लाझा, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व),मुंबई - ४०००५९
सीआयएन: एल६५९९०एमएच२०१०पीएलसी२४०७०३ **दूरध्वनी:** ९१ ०२२ ६७४२५११८ **ई-मेल:** corporate@homefirstindia.com
संकेतस्थळ: https://homefirstindia.com/

बँक ऑफ बडोदा — Bank of Baroda

बँक ऑफ बडोदा
मुंबई मेट्रो वेस्ट रिजनः दुसरा व चौथा मजला, शुभ जीवन आर्केड, मोक्ष प्लाझा समोर, एस. व्ही. रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई - ४०००९२, भारत
ई-मेलः recovery.mmrn@bankofbaroda.com वेबसाइटः www.bankofbaroda.com

स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना - "परिशिष्ट-IV-अ [नियम ६(२) आणि ८(६) मधील तरतुदी पहा]"

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ६(२) आणि ८(६) च्या तरतुदीसह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत,स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

सर्वसाधारण जनतेस तसेच विशेषतः कर्जदार/गहाणदार/हमीदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की खाली नमूद केलेली स्थावर मालमत्ता, जी बँक ऑफ बडोदा, सुरक्षित कर्जदाता यांच्याकडे गहाण/तारण ठेवण्यात आलेली आहे व ज्याचा ताबा अधिकृत अधिकाऱ्याने घेतलेला आहे, ती खाली नमूद खात्यामधील देणी वसूल करण्यासाठी **"जे आहे जिथे आहे", "जे आहे जसे आहे" आणि "जे काही आहे तिथे आहे"** या आधारावर विकली जाईल. कर्जदार/गहाणदार/हमीदार/सुरक्षित मालमत्ता/देणी/राखीव किंमत/ई-लिलाव दिनांक व वेळ, इरठे आणि बोली वाढ रक्कम यांचे तपशील खाली नमूद केले आहेत.

अ.क्र./ लॉट क्र	कर्जदार/हमीदार/गहाणदार यांचे नाव व पत्ता	ज्ञात भारांसह, असल्यास, स्थावर मालमत्तेचे तपशीलवार वर्णन	एकूण देणी	ई-लिलाव दिनांक व वेळ	राखीव किंमत, / इरठे रक्कम, / बोली वाढ रक्कम	ताबा स्थिती (रचनात्मक/ प्रत्यक्ष)	मालमत्ता पाहणी दिनांक व वेळ
१.	श्री. नागेंद्र कमलदेव सिंग आणि सौ. सरोज नागेंद्र सिंग (कर्जदार) दुकान क्र. १, त्रिमूर्ती सीएचएस, साईबाबा मंदिर गल्ली, नवघर रोड, अमरज्योती स्कूलजवळ, भायंदर पूर्व, महाराष्ट्र - ४०११०५	फ्लॅट क्र. २०१, इमारतीच्या "बी" विंगमधील दुसऱ्या मजल्यावर, "प्रार्थना" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत, प्रकल्प "स्वप्नलोक रेसिडेन्सी" म्हणून ओळखला जाणारा, सर्वे क्र. ४५६, महसूल गाव उमरोली, तालुका व जिल्हा पालघर - ४०१४०४, मोजमाप ४३.१२ चौ. मी. बांधकाम क्षेत्र	रु. १५,९७,८४६/- दिनांक ३०.०४.२०२६ पर्यंत, तसेच त्यावरील व्याज व इतर **कायदेशीर खर्च. भारः बँकेस ज्ञात नाही**	**२६.०५.२०२६** १४:०० ते १८:००	**रु. ९,६७,०००/- रु. ९६,७००/- रु. ५०००/-**	प्रत्यक्ष	**२०.०५.२०२६ १२:३० ते १४:००**
२.	सौ. रोहिणी संदेश भोईर (कर्जदार) ओम साई अपार्टमेंट, रूम क्र. ४०२, साईबाबा मंदिरासमोर, कारगिल एनजीआर, मानवेलपाडा रोड, विरार पूर्व, महाराष्ट्र - ४०१३०५	गहाण मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड ज्यावर फ्लॅट क्र. ४०२, चौथ्या मजल्यावर, "ओम साई अपार्टमेंट" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत, सर्वे क्र. १६२, हिस्सा क्र. अ, विंग 'अ' मध्ये स्थित आहे, गाव विरार, कारगिल नगरजवळ, साईबाबा मंदिराजवळ, विरार (पूर्व), तालुका वसई, जिल्हा ठाणे, उप-नोंदणी कार्यालय वसई क्र. II (विरार), पालघर, महाराष्ट्र - ४०१२०५ यांच्या क्षेत्रात. मोजमाप ४३२ चौ. फूट म्हणजेच ४०.१५ चौ. मी.	रु. १४,०२,५१६/- दिनांक ३०.०४.२०२६ पर्यंत, तसेच त्यावरील व्याज व इतर कायदेशीर खर्च. **भारः बँकेस ज्ञात नाही**	**२६.०५.२०२६** १४:०० ते १८:००	**रु. ८,९५,०००/- रु. ८९,५००/- रु. ५,०००/-**	प्रत्यक्ष	

विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तींसाठी कृपया वेबसाइट लिंक https://www.bankofbaroda.in/e-auction.htm आणि ऑनलाइन लिलाव पोर्टल https://baanknet.com येथे भेट द्या.

दिनांकः ०६.०५.२०२६
ठिकाणः मुंबई

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी,
बँक ऑफ बडोदा

जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (दिवाळखोरीमध्ये)

नोंदणीकृत कार्यालय - स्टर्लिंग सेंटर, ४०१-४०७, चौथा मजला, डिव्हाईन चाइल्ड हायस्कूल समोर, अंधेरी कुर्ला रोड, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३ सीआयएन : L99999MH1992PLC066213
(सन्मा. एनसीएलटीच्या दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ च्या आदेशानुसार दिवाळखोरी प्रक्रियेतून जात असलेली कंपनी)

ई-लिलावासाठी सार्वजनिक घोषणा
दिवाळखोरी आणि कर्जबाजारीपणा कोड, २०१६ अंतर्गत सूचना व कर्जबाजारीपणा व दिवाळखोरी बोर्ड ऑफ इंडिया (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ अंतर्गत

खाली सही करणाऱ्याद्वारे याद्वारे सर्वसामान्य जनतेला ई-लिलावाची सूचना देण्यात येत आहे, ज्यामध्ये **जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (लिक्विडेशनमध्ये) (कॉर्पोरेट कर्जदार)** यांच्या मालकीच्या आणि कॉर्पोरेट कर्जदाराच्या लिक्विडेशन इस्टेटचा भाग असलेल्या ११ मालमत्तांच्या (खालील तक्त्यात वर्णन केलेल्या) विक्रीसाठी बोली आमंत्रित करण्यात येत आहेत. ही विक्री दिवाळखोरी आणि कर्जबाजारीपणा कोड, २०१६ **(आयबीसी)** च्या तरतुदींनुसार, त्याअंतर्गत तयार केलेल्या नियम आणि विनियमांसह, जशी आहे तशी, जशी आहे तशी, जशी आहे तशी, जे काही आहे, कोणत्याही दाव्याशिवाय या तत्त्वावर आणि कोणत्याही प्रतिनिधित्वाशिवाय, हमीशिवाय किंवा क्षतिपूर्तीशिवाय केली जाईल.
ही विक्री अधोस्वाक्षरी करणाऱ्याद्वारे, आयबीबीआय (लिक्विडेशन प्रोसेस) रेग्युलेशन्स, २०१६ च्या रेग्युलेशन ३२ आणि दिनांक ०७ मे २०२६ च्या मालमत्ता विक्री प्रक्रिया मेमोरँडम **(एएसपीएम)** नुसार, ई-लिलाव प्लॅटफॉर्म **बँकनेट** (पूर्वीचे ईबीक्राय **https://ibbi.baanknet.com**) **(ई-लिलाव प्लॅटफॉर्म)** या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे केली जाईल.

ई-लिलावाच्या महत्त्वाच्या तारखांचे वेळापत्रक	
पात्रतेची कागदपत्रे आणि कलम २९ए अंतर्गत हमीपत्र सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ	**६ जून २०२६, सायंकाळी ५:०० वाजता**
इसारा रक्कम ठेव **(इरठे)** जमा करण्याची अंतिम तारीख आणि वेळ	**६ जून २०२६, सायंकाळी ६:०० वाजता**
ई-लिलावाची तारीख आणि वेळ	**९ जून २०२६, दुपारी १२:०० ते सायंकाळी ६:००**
अंतिम विक्री मोबदला भरण्याची अंतिम तारीख	अंतिम विक्री मूल्याच्या देयकासाठी अधोस्वाक्षरीकर्त्याद्वारे मागणी पत्र जारी केल्याच्या तारखेपासून साठ (६०) दिवसांच्या आत.

अनु. क्र.	मालमत्तेचे वर्णन	मालमत्ता आयडी	लिलाव आयडी	इसारा रक्कम ठेव (रु. मध्ये)	विस्तार मूल्य (रु. मध्ये)
१	कटलरी, मग्ज, ग्लासेस यांच्यासह कॅटरिंग आयटम्स **असेट आयडी : ३५८९**	३६३६	३,८४,७५,४२१	३८,४७,५४२	१९,२३,७७१
२	अटलास मील कार्टस **असेट आयडी : ३३९४**	३६३२	१,७६,१०,२६२	१७,६१,०२६	८,८०,५१३
३	अटलास मील कार्टस **असेट आयडी : ३५८८**	३६३४	७५,८८,३६३	७,५८,८३६	३,७९,४१८
४	अटलास मील कार्टस **असेट आयडी : ३५४४**	३६३३	६१,३७,७३०	६,१३,७७३	३,०६,८८७
५	शर्टस, फूटवेअर, रेनवेअर यांच्यासह युनिफॉर्म्स **असेट आयडी : ३५९१**	३६३८	४,९६,५६०	४९,६५६	२४,८२८
६	प्रिंटींग व स्टेशनरी बाबी **असेट आयडी : ३५९०**	३६३७	८९,५४५	८,९५५	४,४७७

ठिकाण : केएच. क्र. ११४०-११४२, लुथरा इस्टेट, राजोकरी, साउथवेस्ट दिल्ली - ११००३८

*इतर गोष्टींबरोबरच, कर, उपकर, शुल्क, जकाती, हस्तांतरण शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, प्रीमियम आणि विक्री पूर्ण करण्यासाठी लागणारे सर्व लागू आवश्यक खर्च वगळून. स्वाक्षरी करणाऱ्याकडून कोणतेही प्रतिनिधित्व, हमी किंवा नुकसानभरपाई दिली जाणार नाही.

महत्त्वाच्या सूचना :

१. वर नमूद केलेल्या ६ मालमत्तांसाठी बँकनेट पोर्टलवर स्वतंत्र ई-लिलाव आयोजित केले जातील.
२. ही विक्री सूचना, आयबीसीच्या कलम २९ए अंतर्गत पात्रतेसाठी मालमत्तेचा तपशील, घोषणापत्रे, शपथपत्रे आणि हमीपत्रे असलेल्या संबंधित एएसपीएम आणि ई-लिलाव विक्रीच्या सामान्य आणि तांत्रिक अटी व शर्ती यांच्यासोबत वाचली जावी. लिलाव विक्री, बँकनेटवर उपलब्ध.
३. इच्छुक बोलीदारांनी आवश्यक पात्रता कागदपत्रे आणि अनामत रक्कम ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे विहित कालमर्यादेत सादर करावी.
४. इच्छुक निविदाकारांनी असे हमीपत्र सादर करावे की, ते लागू असलेल्या मर्यादेपर्यंत आयबीसीच्या कलम २९ए अंतर्गत कोणत्याही अपात्रतेस पात्र नाहीत आणि कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळल्यास, इरठे जप्त केली जाईल.
५. ई-लिलावासंबंधी कोणत्याही प्रश्नासाठी, कृपया लिक्विडेटरचे अधिकृत प्रतिनिधी **श्री. श्लोक नंदनपवार** (+९१-८२०८५०३६९३) यांच्याशी **jetliquidation@in.ey.com** आणि **liquidation.jet@gmail.com** या ईमेल आयडीवर जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड : मालमत्ता विक्री - कॅटरिंग व ॲडमीन असेट्स दिल्ली या विषयासह संपर्क साधा.
६. हे स्पष्ट करण्यात येते की, ही सूचना स्वाक्षरी करणाऱ्यावर किंवा जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (लिक्विडेशनमध्ये) वर विक्री प्रक्रिया पूर्ण करण्याचे कोणतेही बंधनकारक दायित्व निर्माण करत नाही. स्वाक्षरी करणाऱ्याने घेतलेला कोणताही निर्णय अंतिम असेल आणि सर्व संभाव्य बोली लावणाऱ्यांवर बंधनकारक राहील.
७. हे स्पष्ट केले जाते की, येथे आणि संबंधित एएसपीएममध्ये नमूद केलेला मालमत्तेचा तपशील केवळ सामान्य संदर्भासाठीच दिला आहे. नुकसानभरपाई प्राप्त करणारे पक्ष (संबंधित एएसपीएममध्ये परिभाषित केल्यानुसार) मालमत्तेच्या वर्णनात, परिमाणात किंवा स्थितीत असलेल्या कोणत्याही प्रकारच्या त्रुटी/अचूकता/विसंगती/चुकीचे विधान/वगळणे/फरक/कमतरता किंवा चुकीसाठी कोणतीही जबाबदारी किंवा उत्तरदायित्व स्पष्टपणे नाकारतात आणि त्यांची कोणतीही जबाबदारी असणार नाही; मग ती इन्व्हेंटरी ऑडिट अहवालातून उद्भवलेली असो किंवा अन्य कोणत्याही प्रकारे, आणि अशी विसंगती ई-लिलाव पूर्ण होण्यापूर्वी, दरम्यान किंवा नंतर आढळली असो वा नसो. मालमत्तेची विक्री केवळ जशी आहे तशी, जे आहे ते जसे आहे तसे, जसे आहे तसे आणि कोणत्याही दाव्याशिवाय या तत्त्वावर केली जाते आणि नुकसानभरपाई प्राप्त करणाऱ्या पक्षांकडून कोणतेही प्रतिनिधित्व, हमी किंवा नुकसानभरपाई (मालमत्तेचे प्रमाण, स्थिती किंवा गुणवत्तेसह) दिली जात नाही. ई-लिलावात सहभागी होऊन, प्रत्येक संभाव्य बोलीदार हे मान्य करतो की, मालमत्तेची प्रत्यक्ष तपासणी आणि पडताळणी यासह, परंतु इतकेच मर्यादित नसलेल्या, स्वतःच्या स्वतंत्र योग्य तपासणीची जबाबदारी पूर्णपणे त्याचीच आहे, आणि मालमत्तेच्या परिमाणीकरण, वर्णन किंवा स्थितीमधील कोणत्याही विसंगती, कमतरता, त्रुटी किंवा उणीवेबद्दल, किंवा त्यामुळे अशा संभाव्य बोलीदाराला झालेल्या कोणत्याही नुकसानी, हानी, खर्च किंवा व्ययाबद्दल, मग ते अपेक्षित असो वा नसो, त्याला नुकसानभरपाई देणाऱ्या कोणत्याही पक्षांविरुद्ध कोणत्याही स्वरूपाचा कोणताही दावा, मागणी, कारवाई किंवा उपाययोजना करण्याचा हक्क राहणार नाही आणि तो असा कोणताही दावा, मागणी, कारवाई किंवा उपाययोजना करण्याचा हक्क सोडून देतो.
८. सर्व संभाव्य बोलीदार हे स्पष्टपणे मान्य करतात की, त्यांच्या बोली केवळ त्यांनी केलेल्या योग्य तपासणीच्या आधारावर सादर केल्या जातील आणि संबंधित एएसपीएममध्ये दिलेल्या माहितीवर अवलंबून राहणार नाहीत. संभाव्य बोलीदार, त्यांच्या बोली येथे दिलेल्या माहितीच्या आधारावर सादर केल्या गेल्या होत्या या कारणास्तव, संबंधित एएसपीएम नुसार आयोजित केल्या जाणाऱ्या ई-लिलावांच्या संदर्भात कोणतेही हक्क/वाद आणि/किंवा बचाव स्पष्टपणे सोडून देत आहेत.
९. लिक्विडेटर आपल्या स्वविवेकानुसार एएसपीएमच्या अटींमध्ये सुधारणा/बदल करण्याचा आणि विक्री प्रक्रियेच्या वेळापत्रकात, ई-लिलाव प्रक्रियेच्या तारखांसहित परंतु इतकेच मर्यादित नाही, सुधारणा करण्याचा अधिकार राखून ठेवतो. लागू कायद्यांनुसार अन्यथा तरतूद केल्याखेरीज, लिक्विडेटर एससीसीच्या सल्ल्यानुसार, कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर ई-लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचा/थांबवण्याचा अधिकार राखून ठेवतो.

सही/-
सतीश कुमार गुप्ता
जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडचे लिक्विडेटर
आयपी नोंदणीकरण क्रमांक : आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी०००२३/२०१६-१७/१००५६
एएफए क्रमांक - एए१/१००५६/०२/३११२२६/१०८४५४
एएफए वैधता ३१ डिसेंबर, २०२६
पत्रव्यवहाराचा पत्ता : ४०१-४०७, स्टर्लिंग सेंटर, चौथा मजला, अंधेरी कुर्ला रोड, चाकाला, अंधेरी पूर्व, मुंबई ४०००९३
ईमेल : liquidation.jet@gmail.com

दिनांक : ०७.०५.२०२६
ठिकाण : मुंबई